CR- 2019031617

क्र.रा.भू.अ.आ.का.२/स्कॅनींग काम/२०१९
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख
महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय
पुणे दि. १६/०३/२०१९

**परिपत्रक**

**विषय - जुन्या भूमि अभिलेखांचे स्कॅनींग तात्काळ काम पुर्ण करणेबाबत सुचना**

असे निदर्शनास आले आहे की, डिजीटल इंडीया भूमि अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रमा अंतर्गत आधुनिक अभिलेख कक्ष उभारणी या घटकाद्वारे राज्यातील जुन्या भूमि अभिलेखांचे स्कॅनींग करुन, तो डाटा डिजीटल स्वरुपात जतन करणेचे काम शासन निर्णय दि. ६.६.२०१४ नुसार सुरु झाले असुन ते काम हे अदयाप पुर्ण झालेले नाही व ही बाब असमाधानकारक आहे.

**अ) जुन्या भूमि अभिलेखाचे स्कॅनींग काम**

स्कॅनींग काम अदयापी पुर्ण झालेले नाही, स्कॅनींग कामाची गती अतिशय संथ आहे अशा ठिकाणी काम सत्वर पुर्ण करण्याच्या हेतुने पुढील प्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

१. जिल्हयासाठी एकंदर मंजुर असलेल्या स्कॅनीग पानांचे स्कॅनींग काम अदयापी पुर्ण केलेले नाही. स्कॅनींग ,मेटाडेटा एन्ट्री इ. काम संबंधीत एजन्सी यांना सत्वर पुर्ण करुन देणेबाबत वेळोवेळी सभेमध्ये व व्हिडीओ कॉन्फरन्स द्वारे घेणेत आलेल्या आढावा बैठकीत सुचना देण्यात आलेल्या आहेत त्या जिल्हयासाठी मंजुर असलेल्या पानांपैकी अपुर्ण असलेल्या स्कॅनींग काम संबंधीत एजन्सी यांचे मार्फत तात्काळ पुर्ण करुन घेण्यात यावे व यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी. संबंधीत एजन्सी सदरचे काम पुर्ण करुन देण्याचे असमर्थ असल्यास / टाळाटाळ करीत असल्यास रितसर नोटीस देवुन एजन्सी यांचेशी केलला करार रदद करावा . एजन्सी यांना त्यांचे कडुन अपुर्ण राहीलेले स्कॅनींग पुर्ण केले नसल्याने, अपुर्ण राहीलेल्या कामाचे मुल्य देय बिलातुन वसुली केले जाईल व काम मुदतीत पुर्ण केले नाही या बाबी खाली शास्ती घेणेत येईल या आशयाची नोटीस देणेत येवुन त्यानुसार कार्यवाही करावी.

२. जिल्हयातील अदयापी स्कॅनींग काम पुर्ण न केलेल्या जिल्हयात स्कॅनींग काम पुर्ण करणेच्या दृष्टीने प्रथम नियुक्त असलेल्या स्कॅनींग एजन्सी यांना त्यांचे कामा बाबत रितसर नोटीस देवुन त्यांचेशी केलेला करार रदद केल्यानंतर व या कार्यालयाकडुन पुरविण्यात आलेला स्कॅनरचा वापर करुन,कार्यालयीन कर्मचारी अथवा बाहय मनुष्यबळाचा वापर करुन पुर्ण करणेत यावे. बाहय मनुष्यबळाचा वापर हा उद्योग, ऊर्जा कामगार विभाग,शासन निर्णय क्रमांक : भाखंस २०१४/ प्र.क्र.८२ / भाग-III /उद्योग-४, दि. १ डिसेंबर, २०१६ व या कामी येणारा खर्च शासन निर्णय वित्त विभागाकडील निर्णय क्रं. विअप्र १०.०८/प्र.क्रं.७०/२००८/ विनियम दि. १५ मे २००९ नुसार संबंधीत कार्यालयास असलेल्या वित्तीय अधिकार कक्षाच्या मर्यादेत विहित नियमांचे पालन करुन करण्यात यावा.

३. जिल्हयातील शिल्लक असलेले स्कॅनींग काम हे कार्यालयातील कर्मचारी यांचेकडे सोपविलेल्या कामाचा आढावा घेवुन कार्यालयीन कर्मचारी यांचे मार्फत शक्य होत नसल्यास सदरचे काम हे सेतु संस्थेतील कर्मचारी अथवा शासकीय संस्था- आयटीआय, पॉलीटेक्नीकल कॉलेज, या संस्थेमधील विदयार्थी यांना कमवा व शिका या धोरणानुसार विहित नियमांचे पालन करुन पुर्ण करुन घेण्यास मुभा देण्यात येत आहे.

उपरोक्त प्रमाणे स्कॅनींग कामासाठी नियुक्त असलेल्या एजन्सी व्यतिरिक्त् अन्य स्त्रोतांचा वापर करुन पुर्ण करुन घेतल्यास संबंधीत एजन्सी यांना आदा करावयाच्या बिलामधुन वरील प्रमाणे येणारा खर्च हा संबंधीत एजन्सी यांना आदा करावयाच्या बिलाच्या रकमेमधुन वसुली करुन घेण्यात यावा व स्कॅनींग एजन्सी यांचेकडे सोपविलेले काम त्यांनी मुदतीत पुर्ण न केल्यामुळे त्यांचेवर शास्ती लावणे बाबत आवश्यक तो प्रस्ताव मुळ निविदा प्रकियेनुसार सादर करावा.

**ब) स्कॅनींग कामामधील त्रुटी पुर्तता काम**

जुन्या भूमि अभिलेखांचे. स्कॅनींग काम पुर्ण झाल्यानंतर स्कॅन इमेज व मेटाडेटा या मध्ये कोणत्याही प्रकारचे दोष राहु नयेत या कामी राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र यांचे मार्फत विकसीत करण्यात आलेले **डेटा ऍनेलेसीस ॲप** रन केल्यानंतर या आज्ञावलीचे माध्यमातुन स्कॅनींग कामातील आढळुन आलेल्या त्रुटींची पुर्तता, स्कॅनींग कामासाठी नियुक्त केलेल्या एजन्सी यांनी पुर्ण करुन देणे, तसेच त्रुटी पुर्तता करणेसाठी संबंधीत एजन्सी यांनी आवश्यक मनुष्यबळ पुरविणे हे त्यांचेवर बंधनकारक आहे.

१ स्कॅनींग कामासाठी नियुक्त केलेल्या एजन्सी यांनी स्कॅनींग कामात उद्धभवलेल्या त्रृटींची पुर्तता हे काम आवश्यक मनुष्यबळाचा पुरवठा करणे बाबत रितसर नोटीस दयावी. नोटीस देवुनही मनुष्यबळाचा पुरवठा न केल्यास सदरचे काम कार्यालयीन कर्मचारी वापरुन पुर्ण करुन घ्यावे अथवा कार्यालयातील कामाचा आढावा घेवुन सदरचे काम कार्यालयीन कर्मचारी यांचे मार्फत शक्य होणार नसल्यास बाहय मनुष्यबळाचा वापर करुन पुर्ण करुन घेण्यात यावे . त्रुटी पुर्तता कामी वापर करण्यात आलेल्या बाहय मनुष्यबळासाठी उदभवलेला खर्च हा संबंधीत एजन्सी यांचे बिलातुन वसुल करुन घेणे बाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. तसेच मुळ निविदा प्रक्रीयेतील अ.नं. ७.२ पेनल्टी टर्म नुसार प्रत्येक तालुक्यासाठी दररोज रु. ५०००/- ( अशी दंडाची रक्कम ही जास्तीतजास्त जिल्हयाच्या प्रॉजेक्ट किंमतच्या १० टक्के एवढी राहील) वसुली केली जाईल

२ स्कॅनिंग काम वेळेत व अचुकपणे पुर्ण करुन न घेतल्यास संबंधीत अधिकारी यांचेवर जबाबदारी कायम करणेची कार्यवाही करणेत येईल.

वरील सुचनांची अंमलबजावणी तात्काळ होणेची आहे.

16/03/2019

(दा.सो.तळपे)
उपसंचालक भूमिअभिलेख(एकत्रीकरण)
संलग्न जमाबंदी आयुक्त पुणे

**स्थळ प्रतिवर मा.ज.आ.पुणे यांची स्वाक्षरी असे**

प्रत- जिल्हाधिकारी (सर्व) यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी

प्रतं - उपसंचालक भूमि अभिलेख (सर्व) यांना आवश्यक कार्यवाहीसाठी

प्रत- जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख (सर्व)/ नगर भूमापन अधिकारी (सर्व) यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी